# महात्मा गांधी यांचे लोकशाही विषयक विचार

**मिनाक्षी गंगाधर मिणचे,** श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी

---

**सारांश**

भारतीय स्वातंत्र्याची शिल्पकार राष्ट्रपिता म्हणून महात्मा गांधी ओळखले जातात आदर्शवादी व अध्यात्मवादी महान पुरुष म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो धार्मिक ग्रंथांचा व राजकीय विचारवंतांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता गांधीजींनी जनसेवा मानवी गुणांची जोपासना सामाजिक समता व न्याय या घटकांवर भर दिला यांच्या राजकीय विचारांचा आधार सत्य अहिंसा हाच होतासत्य व अहिंसेच्या मार्गाचा वापर लोकशाहीत ही करावा लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सुजाण अनुशासित नागरिक जसे आवश्यक आहेत तसेच अहिसे च्या पायावर उभारलेली लोकशाही भक्कम बळकट व स्थीर असते प्रतिनिधीक लोकशाहीत प्रतिनिधींच्या संख्येपेक्षा प्रतिनिधित्व करण्याची प्रामाणिक इच्छा ही आवश्यक आहे लोकशाहीची सेवा करणारा निस्वार्थी असला पाहिजे त्यांनी स्वतः बद्दल व पक्षाबद्दल विचार न करता लोकशाही बद्दल विचार केला पाहिजे असे मत महात्मा गांधींनी अहिंसेचे व सत्याचे पुजारी म्हणून जगासमोर ठेवले.

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार म्हणून महात्मा गांधी ओळखले जातात तसेच महात्मा गांधीजींना राष्ट्रपिता असा दर्जा देण्यात आला आहे महात्मा गांधीजींनी आपल्या अहिंसात्मक आंदोलनाच्या माध्यमातून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले भारतात लोकशाही शासन पद्धती निर्माण व्हावी यासाठी त्यांनी आग्रही भूमिका घेतली. महात्मा गांधींच्या मते लोकशाहीचा अर्थ हा सर्वांच्या कल्याणासाठी सर्व वर्गातील लोकांची सर्व भौतिक ,आर्थिक, आणि अध्यात्मिक संसाधने जुळवण्याची कला आणि विज्ञान असा असला पाहिजे महात्मा गांधींना अनुशासित लोकशाही अपेक्षित होती जे स्वातंत्र्य अनुशासन व विनम्रतेतून निर्माण होते ते हिरावून घेतले जाऊ शकत नाही. अनुशासित आणि सुजाण लोकशाही जगातील सर्वात चांगली गोष्ट आहे. पूर्वग्रह अज्ञान आणि अंधविश्वास यांनी युक्त अशी लोकशाही अव्यवस्थेला जन्म देते आणि ती स्वतःचाच नाश करते.

लोकशाहीत व्यक्तीची इच्छा समाजाच्या इच्छेद्वारा प्रकट होते तिला राज्य म्हणतात लोकशाही नियंत्रित आणि सीमित होत असते आणि राज्य लोकमता द्वारे नियंत्रित होत असते प्रत्येक व्यक्ती जर कायदा आपल्या हातात घेईल तर राज्य नावाची गोष्ट राहणार नाही अराजकता पसरेल. आणि याचा अर्थ सामाजिक कायद्याचा म्हणजेच राज्याचा लोप होईल

महात्मा गांधी म्हणतात लोकशाहीत लोकशाहीची सेवा करण्याची ज्याची इच्छा असेल त्यांनी निस्वार्थी असले पाहिजे त्यांने,स्वतःबद्दल व स्वतःच्या पक्षाबद्दल विचार न करता केवळ लोकशाही बद्दल विचार केला पाहिजे

**उद्दिष्टे**

१. महात्मा गांधीजींची लोकशाही विषयक संकल्पना जाणून घेणे

२. महात्मा गांधीजींच्या लोकशाही विषयक विचारांचा अभ्यास करणे

**गृहीतके**

१.महात्मा गांधीजींच्या लोकशाही या संकल्पनेने प्रतिनिधिक लोकशाही या संकल्पनेचा स्वीकार करणे शक्य झाले आहे

२.महात्मा गांधींच्या लोकशाही विषयक विचारांच्या संकल्पनेतून अनुशासित व सुजान लोकशाही राज्य निर्माण करणे शक्य झाले आहे

**अभ्यास पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम साधन सामग्री वर आधारित आहे महात्मा गांधींनी लिहिलेल्या पुस्तकांच्या आणि त्यांच्यावर विविध लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचा तसेच संदर्भ ग्रंथ इंटरनेट यांचा वापर सदर शोध निबंधासाठी केलेला आहे.

**लोकशाहीत प्रतिनिधित्व**

महात्मा गांधी यांच्या मते लोकशाहीत प्रतिनिधीची संख्या जास्त असल्यास कामकाज चांगले होऊ शकते व लोकशाही सिद्धांताचे रक्षण होऊ शकते ही धरणा पूर्णपणे चुकीची आहे अधिक संख्येच्या बेजबाबदार प्रतिनिधींपेक्षा लोकशाही करिता दक्ष असलेले उदार मनाचे आणि सत्याची चाड असलेले संख्येने कमी प्रतिनिधी लोकशाहीचे अधिक चांगले रक्षण करू शकतील.लोकशाहीच्या रक्षणाकरीता लोकांमध्ये स्वातंत्र्य स्वाभिमान आणि ऐक्याची भावना उत्कंठ असली पाहिजे आणि जे लोक सज्जन आणि सत्यनिष्ठ असतील त्यांनाच त्यांनी निवडले पाहिजे. लोकप्रतिनिधींची संख्या कमी असली तरी त्या प्रतिनिधींनी मध्ये लोकांच्या भावना आणि आकांक्षा यांचे प्रतिनिधित्व करण्याची इच्छा असेल तर खऱ्या अर्थाने  लोकशाहीचे कोणतेही नुकसान होत नाही तर बळजबरीने लोकशाहीचा विकास होऊ शकत नाही तो आतून उमलला पाहिजे

भारताच्या खऱ्या लोकशाहीत प्रत्येक गावाला एक घटक मानले जाईल खरी लोकशाही केंद्रात बसलेल्या मोजक्या लोकाद्वारे चालवली जाणार नाही तर तिचे संचालन प्रत्येक गावपातळीतील लोक करतील

**लोकशाही आणि अहिंसा**

गांधींच्या मते लोकशाही व अहिसा सोबत चालु शकत नाही ज्या राज्यांनी लोकशाही स्वीकारलेली आहे त्यांनी अहिंसक रूप धारण केले पाहिजे. व्यक्तींनी अहिंसेचे आचरण केल्यास राष्ट्रही अहिंसक बनते कारण राष्ट्र हे व्यक्तीचे मिळून बनलेले असतेगांधींच्या मते लोकशाहीत दुर्बल तम व्यक्तिलाही तीच संधी मिळाली पाहिजे जी सर्वात ताकतवान असलेल्या व्यक्तीला उपलब्ध होते आणि ही केवळ अहिसात्मक लोकशाहीतच शक्य आहे लोकशाहीत मतदार जर एखाद्या गुंडप्रवृत्तीस प्रतिनिधी म्हणून नियुक्त करतो तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील किंवा गरजेनुसार सत्याग्रहाच्या तंत्राचा वापर करून मतदारांच्या मध्ये परिवर्तन करावे लागेल हीच खरी लोकशाही होय. लोकशाही यांत्रिक वस्तू नाही जी विशिष्ट ढाच्यात बसवता येईल तर याकरिता लोकांच्या हृदय परिवर्तनाची आवश्यकता आहे. बंधू भावाचा विकास ही आवश्यक आहे. खऱ्या लोकशाहीत प्रत्येक स्त्री-पुरुषाला स्वतःचा विचार करण्याची क्षमता ही उपलब्ध करून दिली जाते. महात्मा गांधींनी लोकशाहीतअहिंसेच्या तत्वालाअनन्यसाधारण महत्त्व दिले लोकशाही शासनाची उभारणी अहिंसेच्या तत्त्वावर अधिक भक्कमपणे केली.

**निष्कर्ष**

१.महात्मा गांधी यांनी नव स्वतंत्र भारताला प्रतिनिधिक लोकशाहीचा मार्ग दाखवला.

२.महात्मा गांधींनी लोकशाहीतील निस्वार्थी दृष्टिकोन भारतीयांपुढे ठेवला.

३.महात्मा गांधींनी अनुशासित व सुजान लोकशाही राज्य निर्माण करणे कसे शक्य आहे हे भारतीयांपुढे मांडले

४.लोकशाहीतील अहिंसात्मक तत्व लोकांसमोर ठेवण्याचे काम महात्मा गांधींनी तर केलेच पण याशिवाय आहिसात्मक लोकशाही भक्कम व बळकट असते हे ही जगासमोर ठेवले.

**समारोप**

एकंदरीतच महात्मा गांधींचा जीवन पट पाहता सत्य ,अहिंसा या तत्वाला दिलेले महत्त्व व भारतासाठी आवश्यक असलेले प्रतिनिधित्व ,लोकशाही व अहिंसात्मक लोकशाही याचे सामर्थ्य संपूर्ण जगाला पटवून दिले निस्वार्थी लोकशाही ही यशस्वी शासनासाठी किती आवश्यक आहे ही त्यांनी पटवून दिले व आपल्या विचारांचा ठसा उमटवण्याचे काम या महान देशाचे सेवकाने केले.

**संदर्भ सूची**

१.गांधी मो.क.- सत्याचे प्रयोग , नवजीवन प्रकाशन अहमदाबाद

२.चौसाळकर अशोक - महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ ,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

३.महात्मा गांधींचे विचार-आर .के. प्रभू आणि यु. आर .राव नवजीवन ,मुद्रणालय अहमदाबाद

४.वर्तमानपत्रे -लोकमत ,सकाळ

५.इंटरनेट

६.मासिक - गांधी युग